# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

## सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या

## माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी

## गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ३६

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडजी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२५१, सचिवालयीन सामाजिक सेवा**<br>**रूपये:- २९,५०,९६,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (१) | ५७८३ | १० | महाज्योतीच्या नागपूर येथील मुख्य कार्यालयाच्या इमारतीकरीता रक्कम रु. १२० कोटी तरतूद करण्याची लोकप्रतिनिधी यांनी दि. ३० जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर या संस्थेचे नागपूरमधील मुख्य कार्यालय (महाज्योती भवन) बांधकामासाठी सिताबर्डी नागपूर भूमापन क्र.१६१२ क्षेत्र २८८७४.९ चौ.मी.पैकी ७०३६ चौ.मी.या जागेचा जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दि. १ एप्रिल २०२२ रोजी महाज्योतीला ताबा दिलेला असणे, महाज्योतीने चलनाद्वारे २७ कोटी ७२ लक्ष १८ हजार ५५७ रुपये भरून ही जागा ताब्यात घेतलेली असणे, महाज्योती भवनच्या या प्रस्तावित बांधकामात मुख्य कार्यालय,ऑडीटोरीयम, सुसज्ज ग्रंथालय, स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण केंद्र, वसतिगृह इत्यादींचा समावेश असणे, या बांधकामाचा आराखडा व अंदाजपत्रके तयार असून यासाठी रक्कम रु. १२० कोटी खर्च येणार असणे, इतर मागास व बहुजन विभागा अंतर्गत असलेल्या महाज्योतीच्या मुख्य कार्यालयाच्या इमारतीकरीता रक्कम रु. १२० कोटी तरतूद करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ५७८४ | १० | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थान मौजे नायगाव ता.खंडाळा जि.सातारा येथे महाज्योती संस्थेमार्फत मुलींकरिता निवासी प्रशिक्षण केंद्र सुरु करणे हे प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेले काम लवकरात लवकर सुरु करण्याची आवश्यकता असणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती)च्या वतीने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव व (राज्य संरक्षित स्मारक), नायगाव ता. खंडाळा जि. सातारा येथे महाज्योती संस्थेमार्फत २०० मुलींसाठी निवासी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (नॅशनल डिफेन्स अकॅडमी) व अन्य स्पर्धा परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी निवासी संकुल उभारणे या कामाला दि.०७.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असणे, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग तसेच इतर वंचित व दुर्लक्षित घटकातील मुलींसाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी व इतर स्पर्धा परीक्षांच्या प्रशिक्षणासाठी निवासी संकुल निर्माण करण्याची नितांत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आवश्यकता असणे, महाज्योती संस्थेमार्फत मुलींकरिता निवासी प्रशिक्षण केंद्र सुरु करणेची योजना राबविण्यासाठी कालबद्ध नियोजन करून हे प्रशिक्षण केंद्र लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: झेडजी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण**<br>**रूपये:- ४२,७९,८८,१४,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (३) | ५९०३ | १० | मलकापूर (जि.बुलडाणा) विधानसभा मतदार संघात बंजारा समाजातिल नागरीकांची गावातील विकास कामे होण्याकरीता वारंवार मागणी होणे, त्या अनुषंगाने, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत कामांना वरील शासन निर्णयाव्दारे मंजुरात देण्यात आलेली असणे, परंतु काही कारणास्त कामांना स्थगिती देण्यात आली असणे, गावातील विकासाकरीता सदरहू कामावरील स्थगिती उठविण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही |
| | | | **श्री. शिरीष चौधरी** |
| (४) | ५९०९ | १० | जळगांव जिल्हयातील रावेर तालुक्यात इतर मागास वर्गीय कल्याण योजने अंतर्गत अनेक कामे प्रलंबित असुन त्यामध्ये मौजे पाल, ता. रावेर येथे तांडावस्तीत रस्ता काँक्रीटीकरण करणे.मौजे लालमाती ता. रावेर येथे गावांतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे.मौजे जिन्सी, ता. रावेर येथे रस्ता काँक्रीटीकरण करणे.मौजे विश्राम जिन्सी, ता. रावेर येथे गावांतर्गत गटारींसह रस्ता कांक्रिटीकरण करणे.मौजे आभोडा बु, ता. रावेर येथे गावांतर्गत रस्ता कांक्रिटीकरण करणे.मौजे आभोडा खु, ता. रावेर येथे गावांतर्गत रस्ता कांक्रिटीकरण करणे.मौजे गुलाबवाडी ता. रावेर तांडावस्तीत पेव्हर ब्लॉक बसविणे.मौजे जुनोने ता. रावेर गावांतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे.मौजे कुसुंबा खु, ता. रावेर येथे गावांतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे.मौजे लोहारा ता. रावेर गावांतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे.या कामासाठी निधी उपलबध करण्याची आवश्यकता असनु याबाबत करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. धिरज देशमुख** |
| (५) | ५८१० | १० | गोंदेगाव ता.लातूर येथे धनगर वस्तीमध्ये सुधाकर खैरे यांचे घर ते बापू खैरे यांचे घरपर्यंत सिमेंट रोड करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ५८११ | १० | वांजरखेडा ता.लातूर येथे तांड्या अंतर्गत सिमेंट रस्ते करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (७) | ५८१२ | १० | पोहरेगाव ता.रेणापूर येथे रामकिशन राठोड ते शहाजी राठोड यांचे घरापर्यंत सिमेंट रोड करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ५८१३ | १० | पोहरेगाव ता.रेणापूर येथे सर्जेराव राठोड ते जि.प.प्रा.शाळा पर्यंत सिमेंट रोड करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ५८१४ | १० | मुरूड ता.लातूर येथे पारूनगर भोरे भांडेवाले यांचे घरासमोरील सिमेंट रोड करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ५८१६ | १० | पानगाव ता.रेणापूर येथे इनामवाडी तांडा येथे विद्युतीकरण करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ५८१७ | १० | शिवली ता.औसा येथे वडार वस्तीमध्ये सभागृह बांधणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५८१८ | १० | ब-हाणपूर ता.औसा येथे नाथजोगी वस्तीत पेव्हर ब्लॉक रस्ता करणे आवश्यक असणे. नागरिकांची गैरसोय होत असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (१३) | ५८३९ | १० | राज्यातील इतर मागास प्रवर्गातील अनेक विद्यार्थी शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळू शकल्याने व शहरात राहण्याची इतर सोय नसल्याने शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दर्शनास आले असणे, अनुसूचित जाती आणि जमातीचे विद्यार्थी निवासाच्या सोयी अभावी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून निर्वाह भत्ता देण्याची योजना आहे, परंतु इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी अशी कोणतीही योजना नसल्यामुळे इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता देण्यात यावा, अशी मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात येत असणे, तसेच स्वाधार आणि स्वयमच्या धर्तीवर इतर मागासवर्ग, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (ड) व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्याची लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली असणे, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना 'आधार' नावाने स्वतंत्र निर्वाह भत्ता योजना सुरु करण्याची असताना त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१४) | ५८५५ | १० | नाशिक येथील उच्च तंत्रशिक्षण विभागाने दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयानुसार मातोश्री वसतीगृहाबाबत सारथी व महाज्योतीसोबत करार करुन प्रवेश प्रक्रियेचे निर्देश देवूनही सारथी आणि महाज्योतीच्या निष्काळजीपणामुळे राज्यातील मराठा कुणबी, ओबीसी आणि आर्थिक दुर्बल घटकांवरील २०० विद्यार्थीनी मातोश्री वसतीगृह योजनेपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास असणे, उक्त विद्यार्थीनी मातोश्री वसतीगृह योजनेपासून वंचित राहिल्याने राज्यातील जनतेत पसरलेला असंतोष सदर वसतीगृह हे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल, २०२२ नुसार अन्वये ७५-७५ इतर मागास प्रवर्ग व मराठा कुणबी समाजाच्या विद्यार्थीनी तर उच्च तंत्रशिक्षण विभागाच्या आर्थिक दुर्बल घटकांमधील ५० विद्यार्थीनी अशा २०० विद्यार्थीनींसाठी निश्चित केले असणे, वसतीगृहामध्ये विद्यार्थीनींना प्रवेश देण्याकरिता व २०० विद्यार्थीनींना वसतिगृह उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| (१५) | ५८५६ | १० | नाशिक जिल्ह्यात वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेमधून भटक्या जमातीमधील नागरीकांना मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक शासनास प्रस्ताव पाठवलेला असणे, उक्त कामे मंजूर करण्याबाबत शासनाकडे होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, सदर योजनेंतर्गत सन २०१८ या कालावधीपासून विकासकामे मंजूर न झाल्यामुळे कामे प्राधान्याने मंजूर करण्याची शिफारस अध्यक्ष वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना यांनी शासनाला केली आहे असणे, भटक्या जमातीमधील नागरीकांना मुलभूत सुविधा निर्माण करण्याकरिता तसेच प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (१६) | ५८५७ | १० | स्वाधार आणि स्वयमच्या धर्तीवर इतर मागासवर्ग, विजा (अ) ,भज (ब), भज (ड) व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्याची शासनाकडे होत असलेली मागणी, मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीमध्ये सुद्धा इमाव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ‘आधार’ नावाने स्वतंत्र निर्वाह भत्ता योजना सुरु करण्याची शिफारस केलेली असल्याच्या अनुषंगाने स्वाधार आणि स्वयमच्या धर्तीवर इतर मागासवर्ग, विजा (अ) ,भज (ब) , भज (ड) व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना ही निर्वाह भत्ता योजना सुरु करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (१७) | ५८५८ | १० | महाज्योती या संस्थेमार्फत राज्यातील मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांना एमपीएससी, यूपीएससीसह, जेईई आणि नीट आदि परिक्षांचे प्रशिक्षण दिले जात असणे, राज्यात अनेक नामांकित कोचिंग क्लासेस असतांना इतर मागास बहुजन कल्याण विभाग (ओबीसी व्हीजेएनटी) मात्र पुण्यातील ज्ञानदीप ॲकॅडमी या एकाच संस्थेलास तब्बल 15 ते 18 कोटींचे काम निविदा न काढतांच देण्यांत आल्याचे निदर्शनास आले असणे, त्यामुळे इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी नागपूर येथे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सुरु असलेल्या महाज्योती संस्थेमध्ये कोटयावधीचा कोचिंग क्लासेस घोटाळा झाला असल्याचे उघडकीस आले आहे असणे, शासनाने याप्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता याबाबत शासनामार्फत करावयाची कार्यवाही. |
| (१८) | ५८५९ | १० | सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय संरक्षण अकादमी स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, अकादमीत मुलींना एनडीए व स्पर्धा पूर्वपरिक्षा निवासी प्रशिक्षण देण्यांत येणार असून यासाठी लागणारी इमारत तसेच अद्ययावत स्वरुपाची सर्व साधनसामुग्रीची उपलब्धतता महाज्योतीच्यावतीने करण्यांत येणार असताना यासाठी लागणारा निधी शासनाने उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता. |
| (१९) | ५८६१ | १० | बार्टीच्या धर्तीवर स्थापन झालेल्या महाज्योती संस्थेचे जिल्हावार प्रशिक्षण केंद्रच अद्याप सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे, सदर जिल्हावार केंद्र नसल्यामुळे राज्यभरातील इतर मागास प्रवर्गाचे शेकडो विद्यार्थी परीक्षा प्रशिक्षणापासून वंचित राहत असणे, महाज्योती संस्थेला स्थापन करुन अडीच वर्षाचा कालावधी होवूनही पोलीस भरती, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, जेईई, नीटचे प्रशिक्षण केंद्र जिल्हावार स्थापन करण्यासाठी इतर मागास प्रवर्ग महासंघाने महाज्योतीच्या कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली असणे, यासंदर्भात शासनाने इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग या कमकुवत घटकांच्या सर्वसमावेश व शाश्वत विकासाकरिता जिल्हावार प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| (२०) | ५८६२ | १० | राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जमातींच्या धर्तीवर राज्यातील इतर मागासवर्ग, विजा (अ), भज(ब), भज(ड) व विमाप्र या प्रवर्गासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकुल योजना सुरु करण्याची राज्य मंत्रिमंडळ उपसमितीने दि. २४ नोव्हेंबर २०२० रोजी शिफारस करूनही माहे जानेवारी २०२३ पर्यंत राज्य शासनाने ही घरकुल योजना सुरु केलेली नसणे, सावित्रीबाई फुले घरकुल योजना सुरु करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर २०२२ मध्ये राज्य शासनाकडे मागणी केलेली असणे, त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले घरकुल योजना सुरु करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (२१) | ५८६३ | १० | राज्यातील मुलींना राष्ट्रीय संरक्षण अकॅडमीसारख्या संस्थेत थेट जाता यावे, याकरिता प्रशिक्षण देण्याकरिता मुलींची एनडीए अकॅडमी सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असणे, मात्र त्यासाठी शासनाने मागील वर्षी निधी मंजूर करुनही महाज्योतीमध्ये संस्थेकडून त्याबाबत अद्याप कार्यवाहीच न झाल्यामुळे आजही राज्यातील मुलींची संरक्षण क्षेत्रात थेट अधिकारी पदावर निवडण्याची संख्या कमीच असणे, गतवर्षी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, केंद्र सरकारने पुणे येथील संरक्षण प्रबोधिनीमध्ये मुलींना प्रवेश देण्याचा निर्णय घेतल्यामुळे अनेक राज्यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीएचे) प्रशिक्षण देण्यासाठी सैनिकी सेवा पूर्व शिक्षण संस्था सुरु केल्याचे यात तेलंगणा, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दिल्लीसारख्या राज्यांचा प्रामुख्याने समावेश असून तेलंगणासारख्या राज्यांनी सीडीएस परिक्षांसाठीही पदवीपर्यंत सैन्य अकॅडमी सुरु केल्या असणे, याच धर्तीवर इतर मागास व बहुजन कल्याण विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या महाज्योतीतर्फे सावित्रीबाई फुले यांच्या जन्मस्थानी नायगाव अकॅडमी येथे सुरु करण्याची घोषणा करण्यात आलेली असणे, मात्र, गेल्या एक वर्षापासून मुलींचे एनडीए अकॅडमी सुरु करण्याकरिता शासनाकडून निधी मिळूनही महाज्योती संस्थेकडून दूर्लक्ष करण्यात येत असल्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (२२) | ५८६५ | १० | इतर मागास वर्ग, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेतील विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच आर्थिक सहाय्य देण्याची मा.मंत्री इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचेकडे मागणी केलेली असणे, इतर मागास वर्ग, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेतील शासन निर्णय दि. ११ ऑक्टो. २०२२ परिच्छेद क्र.२ मधील अट वगळून पूर्वीप्रमाणेच आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (२३) | ५८७० | १० | जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर बोदवड व रावेर तालुक्यात सन 2018 19 या वर्षी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत 290 घरकुले मंजूर असणे अद्यापही सदर घरकुलांचे बांधकामास निधी उपलब्ध नसल्यामुळे वंचित असलेले लाभार्थी सदर घरकुले तात्काळ पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (२४) | ५८८६ | १०० | ओबीसी जातीनिहाय जनगणना करावी ही राज्यातील ओबीसीची खुप दिवसांची मागणी असून त्यासाठी काही दिवसांपूर्वी परभणी जिल्हयातील ओबीसीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठा मोर्चा देखील काढण्यात आला होता. तसेच त्यांच्या पाठपुराव्याचा भाग म्हणून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि.27,28 फेब्रुवारी, व 01 मार्च,2023 या दरम्यान तीन दिवस जिल्हाभरात भव्य मंडल यात्रा देखील काढण्यात आली होती. देशातील व आपल्या बाजुच्या काही राज्यांनी स्वत: हा पुढाकार घेत जातीनिहाय जनगणना सुरु देखील केली आहे. आपल्या राज्यातील आणि परभणी जिल्हयातील जातीनिहाय जनगणना सुरु देखील कली आहे. आपल्या राज्यातील आणि परभणी जिल्ह्यातील जातीनिहाय जनगणनेच्या मागणी बद्दल ओबीसी जनतेच्या भावना तिव्र असून या निवेदनाद्वरे ओबीसी आरक्षण बचाव संघर्ष समिती आपणास मागणी करत आहे की सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन चालु असल्याने सादर होणाऱ्या राज्याच्या बजेट मध्ये ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसाठी केलेली अर्थीक तरतूद व त्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (२५) | ५७८० | १० | इतर मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनींना बाहेरगांवी मोठ्या शहरांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळुनही शासकीय वसतीगृह किंवा निवासाची पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे शिक्षणापासुन वंचित राहावे लागत असणे, राज्य शासनाने इतर मागास प्रवर्गासाठी जिल्हानिहाय वसतीगृहे सुरु करण्याचा घेतला असणे, मात्र ही वसतीगृहे "बाबू जगजीवनराम छात्र आवास" योजनेअंतर्गत केंद्र सरकारचा ६०% व राज्य शासनाचे ४०% टक्के निधीमधून बांधली जाणार असणे, वस्तुत: "बाबू जगजीवनराम छात्र आवास" ही योजना बंद झाल्यामुळे राज्यातील इतर मागास वसतीगृहे बांधकामाला खीळ बसलेली असणे, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये वसतीगृहांसाठी जागा निश्चित करून इतर मागासवर्ग विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी जिल्हानिहाय स्वतंत्र वसतीगृहे बांधण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२६) | ५७८१ | १० | भज-क प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या धर्तीवर वि.जा. (अ) भ.ज. (ब), भ.ज. (ड) व वि.मा.प्र. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजीच्या नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्याची योजना सुरु करण्याची मागणी असणे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचा शासननिर्णय दि.०४.०९.२०१९ अन्वये भज- क प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये प्रवेश देण्याचा निर्णय यापूर्वी घेण्यात आलेला असणे, त्याच धर्तीवर विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब, ड) व विशेष मागास प्रवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजीच्या नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्याची योजना लागु करणे आवश्यक असणे, यासाठी लागणारा आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची व उपाययोजना. |
| (२७) | ५७८२ | १० | इतर मागास बहुजन कल्याण विभागासाठी लोकसंख्या विचारात घेवून निधी अर्थसंकल्पीत करण्याची मागणी असणे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचा सध्याचा नियतव्यय रु. ३००० कोटी असणे, त्यातील रु.२००० कोटी केवळ शिष्यवृत्तीवर खर्च होतात आणि रु. १००० कोटी विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळांवर खर्च होत असणे, त्यामुळे इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या इतर कल्याणकारी योजनांसाठी निधी उपलब्ध होत नसणे, त्यामुळे इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील नागरीकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत निधी अर्थसंकल्पीत करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपयायोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (२८) | ५८६७ | १० | अमरावती जिल्ह्यात विमुक्त जाती व भटक्या जमातीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असणे , राज्य शासनामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमातीतील नागरिकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना ही स्वतंत्र घरकुल योजना अस्तित्वात असणे , या योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ घेण्यासाठी अत्यंत जाचक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अटी असणे , अमरावती जिल्ह्यातील या योजने अंतर्गत बहुतांश प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबीत असणे तसेच मंजूर झालेले घरकुल निधीअभावी रखडले असणे , सदर योजनेतील जाचक अटी दूर करून पात्र लाभयार्थ्यांना निधी उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (२९) | ५८८४ | १० | दर्यापूर मतदारसंघातील विविध गावांमध्ये वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत तांडा वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरवणेसाठी १६४ लक्ष रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त असणे , सदर कामांची निविदा प्रकरीया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश वितरीत होणे बाकी असणे , सदर कामे होणे अत्यंत आवश्यक असून सदर कामांवर शासनामार्फत स्थगिती असल्याने कामांची प्रक्रिया रखडलेली असणे , सदर कामांवरील स्थगिती रद्द करून कामे पूर्ण करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३०) | ५७७२ | १० | विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना (कार्यक्रम) असणे, पण ही योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी नसणे, त्यामुळे ह्या योजनेचे काम संथ गतीने चालू असणे, सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३१) | ५७७३ | १० | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास सहायक अनुदान (कार्यक्रम) असणे, लाभार्थ्यांची मागणी असणे, तथापि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास सहायक अनुदान योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी नसणे, त्यामुळे ह्या योजनेचे काम संथ गतीने चालू असणे, महाराष्ट्र राज्यात ही योजना राबविणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक इतर मागासवर्गीयत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (३२) | ५७७५ | १० | वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ (अनिवार्य) या महामंडळाच्या माध्यमातून भटक्या जमातींच्या विकासासाठी विविध योजना राबविणे, भटक्या जमातींच्या प्रगती व विविकासासाठी विविध कार्यक्रम असणे, मात्र पुरेसा निधी नसल्या कारणाने विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे न होणे, परिणामी भटक्या जमातींच्या विकासाच्या कार्यात खंड पडणे, त्यामुळे सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३३) | ५७७६ | १० | विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती (कार्यक्रम) असणे, दरवर्षी मोठ्या संख्येने शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी अर्ज येणे, परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेण्याकरिता सदर शिष्यवृत्ती योजना विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असणे, तथापि अपुऱ्या निधीमुळे शिष्यवृत्तीपासून हजारो विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागणे, सदर योजनेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भा शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३४) | ५७७७ | १० | माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिष्यवृत्ती (कार्यक्रम) असणे, सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सदर योजना अत्यंत महत्त्वपूर्ण असणे, सदर योजनेसाठी अत्यंत तुटपुंजा निधी असणे, आवश्यक निधी अभावी असंख्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पासून वंचित राहावे लागणे, सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ५७७८ | १० | मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे (कार्यक्रम) असणे, मात्र राज्यामध्ये वसतिगृहांची संख्या फार कमी असणे, वसतिगृहांची संख्या वाढविण्याची नितांत आवश्यकता असणे, विद्यार्थी जास्त मात्र वसतिगृह कमी अशी परिस्थिती असणे, राज्यामध्ये या कार्यक्रमांतर्गत वसतिगृहांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवीही व उपाययोजना. |
| (३६) | ५७७९ | १० | विमुक्त जाती भटक्या जमाती यांच्यासाठी आश्रमशाळा व मुलोद्योगोत्तर आश्रमशाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (कार्यक्रम) असणे, मात्र अपुऱ्या निधीमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना योग्य आहार न मिळणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या अनारोग्याचा प्रश्न निर्माण होणे, सदर आश्रमशाळांना पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २१ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) इतर मागास बहुजन कल्याण विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई